# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/E 94483 दिनांक: 29/12/2021

## परिपत्रक

**विषय :- कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर, IT/ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प इत्यादीच्या पुनर्जीवनासाठी योजना कालावधी वाढविणेबाबत....**

**संदर्भ :-१)परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/E-55105 दि. २६.११.२०२१.**

महामंडळाने दिनांक २६.११.२०२१ च्या सुधारित परिपत्रकान्वये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर, IT/ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प इत्यादिच्या पुनर्जीवनासाठी योजना निर्गमित केलेली आहे.

सदरहू परिपत्रकानुसार ५०० कोटी गुंतवणूक करणा-या उद्योजकांना भूखंड हस्तांतरणानंतर पहिल्या २ वर्षात २० टक्के चटई निर्देशकांचा वापर करणे व उर्वरित २० टक्के चटई निर्देशांक विभागानुसार उर्वरित कालावधीमध्ये किंवा ३ वर्ष यापैकी जास्तीचा असेल त्यामध्ये करण्यात यावा. तसेच ज्या भूखंडामधील हस्तांतरीत कंपनीची गुंतवणूक २५०० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल तर अशा हस्तांतरण करुन घेणा-या कंपनीस भूखंड अनऔपचारीक हस्तांतरण प्रकरणात वापरलेल्या चटई निर्देशकानुसार(FSI) हस्तांतरण शुल्क १० टक्के ऐवजी ३ टक्के तसेच ३० टक्के ऐवजी १५ टक्के आकारण्यात यावे असे धोरण निर्गमित करण्यात आले होते सदरहू योजना दिनांक ३०.०६.२०२१ पर्यन्त लागू करण्यात आली होती

प्रकरणी सदरहू सुधारित परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून कमी कालावधी उद्योजकांना मिळत असल्याने प्रस्तुत प्रकरणी उद्योजकांना परिपत्रक अवगत होणे, कागदपत्रे सादर करणे



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

त्याची छाननी होणे याकरीता लागणारा कालावधी विचारात घेता तसेच कोव्हिड-१९ च्या महामारीचा उद्योगावर झालेला परिणाम विचारात घेता प्रकरणी सदरहू योजनेचा कालावधी वाढविण्याबाबत विषय संचालक मंडळाच्या दिनांक ३०.११.२०२१ रोजीच्या ३९१ व्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात आला प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन, ठराव क्र. ६३५८ पारीत करण्यात आला.

सदरहू पारीत ठरावानुसार महामंडळाने दिनांक २६.११.२०२१ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील अ.क्र. ५, ७ व ८ मध्ये खालीप्रमाणे योजेनेचा कालावधी ३१.०३.२०२२ पर्यन्त वाढविण्यात येत आहे तसेच खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. सदरहू योजना ही एमएमआर, पीएमआर, औरंगाबाद, नाशिक व नागपूर विभागामध्ये दिर्घकालीन बंद ज्या भूखंडधारकाने अद्यापपर्यन्त इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही. तसेच भूखंडावर सद्य:स्थितीत अर्धवट बांधकाम केलेले आहे किंवा भूखंड रिकामा आहे अथवा भूखंड बांधकाम पूर्ण होऊन उत्पादन बंद आहे अशा उद्योगासाठी माहे ३१ मार्च,२०२२ पर्यंतच कार्यान्वित राहील.

२. ५०० कोटी गुंतवणूक करणा-या उद्योजकांना भूखंड हस्तांतरणानंतर पहिल्या २ वर्षात २० टक्के चटई निर्देशकांचा वापर करणे व उर्वरित २० टक्के चटई निर्देशांक विभागानुसार उर्वरित कालावधीमध्ये किंवा ३ वर्ष यापैकी जास्तीचा असेल त्यामध्ये करण्यात यावा. सदरहू योजना माहे ३१ मार्च, २०२२ पर्यंतच कार्यान्वीत राहील.

३. ज्या भूखंडामधील हस्तांतरीत कंपनीची गुंतवणूक २५०० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल तर अशा हस्तांतरण करुन घेणा-या कंपनीस भूखंड अनऔपचारीक हस्तांतरण प्रकरणात वापरलेल्या चटई निर्देशकानुसार(FSI) हस्तांतरण शुल्क १० टक्के ऐवजी ३ टक्के तसेच ३० टक्के ऐवजी १५ टक्के आकारण्यात यावे. सदरहू कंपनीने त्याच्या प्रकल्पात गुंतवणूक केल्याबाबत सनदी लेखापालचे(CA Certificate) प्रमाणपत्र घेण्यात यावे. जर हस्तांतरीत कंपनीने त्याच्या प्रकल्पात नमूद गुंतवणूक (२५०० कोटी व त्यापेक्षा जास्त) नमूद कालावधीत केली नाही तर हस्तांतरीत कंपनीस हस्तांतरामध्ये दिलेल्या सूट व्याजासह वसूल करण्यात यावी. सदरहू योजना माहे ३१ मार्च,२०२२ पर्यंतच कार्यान्वीत राहील आणि कुठल्याही परिस्थितीत सदर योजनेस मुदतवाढ दिली जाणार नाही.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

४. ज्या भूखंडाचे IT/ITES, Nano Techonlogy , Bio-Tech, Robotics, Industries- ४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प या प्रयोजनाकरीता हस्तांतरण होणार आहे. अशा भूखंडाचे Joint Venture कंपनीला हस्तांतरण करताना जर सदरहू भूखंडास मुदतवाढ शुल्क लागू असल्यास त्यास मुदतवाढीसाठी देय असणा-या एकूण मुदतवाढ शुल्काच्या एकूण ३० टक्के आकारणी करण्यात यावी तथापि हस्तांतरण महामंडळाच्या प्रचलित हस्तांतरण धोरणानुसार करण्यात यावे.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अजित पाटील)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in